circular3811.doc


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद

**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.**

**वेबसाईट : www.mcaer.org** **फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.**


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४८११/१६८१ दि. ३ ऑगस्ट,२०११

## <u>प रि प त्र क</u>

**विषयः- विना अनुदानित महाविद्यालयांच्या व्यवस्थापन कोटयातील प्रवेशासाठी उमेदवारांच्या पात्रतेबाबत.**

कृषी व संलग्न विषयाच्या कायमस्वरुपी विना अनुदानित पदवी महाविद्यालयांमधील २० टक्के जागा संबंधित महाविद्यालयाच्या व्यवस्थापनामार्फत भरण्यात येतात. या जागांसाठी ‘ऑनलाईन’ प्रवेश अर्ज केलेले राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील उमेदवार पात्र असतात. मात्र काही उमेदवारांनी ‘ऑनलाईन’ प्रवेश अर्ज दाखल केल्यानंतर महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित यांच्या प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्राकडे मूळ प्रवेश अर्ज विहित मुदतीत प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमध्ये समावेश झाला नाही. परिणामी असे उमेदवार प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहिले. यापैकी काही प्रवेशोच्छुक उमेदवारांनी आवश्यक ती कागदपत्रे जोडून प्रवेश अर्ज ग्राह्य धरण्याबाबत कृषी परिषद कार्यालयाकडे विनंती अर्ज सादर केले होते.

ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर न केलेले आणि कृषी व संलग्न विद्याशाखेच्या पदवी अभ्यासक्रमासाठी पात्र असलेले उमेदवार विना अनुदानित महाविद्यालयाच्या संस्था चालक / प्राचार्यांकडे व्यवस्थापन कोटयातून प्रवेशाची मागणी करतात. तसे काही संस्थाचालक / प्राचार्यांनी कळविलेले आहे.

यास्तव उमेदवार ‘राज्यस्तरीय गुणवत्ता यादी’तील असावा, ही अट शिथील करण्यात येत आहे. विना अनुदानित महाविद्यालयांनी पात्र उमेदवारांना व्यवस्थापन कोटयामध्ये तात्पुरता प्रवेश देऊन त्यांचे प्रवेश अर्ज शुल्क प्रतिविद्यार्थी रु.६००/- कृषी परिषदेकडे ‘वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे’ यांच्या नावे धनाकर्षाद्वारे जमा करावे आणि उमेदवारांची पात्रता संबंधित कृषी विद्यापीठांनी निश्चित केल्यानंतरच व्यवस्थापन कोटयातील प्रवेश अंतिम समजण्यात यावेत.

**तत्पूर्वी व्यवस्थापन कोटयामध्ये प्रवेश देण्यासाठी खालील प्राधान्यक्रम अवलंबिण्यात यावा.**

**१. विद्यापीठ / राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये समावेश असलेले उमेदवार.**

**२. 'ऑनलाईन' प्रवेश अर्ज दाखल केलेले परंतु काही कारणास्तव त्यांचा विद्यापीठ / राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये समावेश नाही, असे सोबतच्या परिशिष्टातील उमेदवार.**

**३. 'ऑनलाईन' प्रवेश अर्ज सादर न केलेले मात्र संबंधित अभ्यासक्रमाकरिता पात्र उमेदवार.**

**उक्त प्राधान्यक्रमामध्ये उमेदवाराची गुणवत्ता सुध्दा विचारात घेण्यात यावी.**

सदरचे परिपत्रक सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशाकरिता असल्याने आगामी शैक्षणिक वर्षांसाठी हे परिपत्रक लागू असणार नाही तसेच या सुविधेचा फायदा भविष्यात घेण्यासाठी ही बाब 'पुर्वोदाहरण' म्हणून संबोधित करता येणार नाही, याचीदेखील नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी.

सोबत- परिशिष्ट.

**मा.महासंचालक**
**यांच्या मान्यतेने.**

**स्वाक्षरीत/-**
**संचालक (शिक्षण)**

प्रतिलिपी-

व्यवस्थापक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे व यासंबंधी सर्व विना अनुदानित महाविद्यालयांना ई-मेल संदेश आणि भ्रमणध्वनी संदेशाद्वारे अवगत करावे. तसेच परिशिष्टातील सर्व उमेदवारांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे कळविण्यात यावे.

प्रत माहितीसाठीः-

(१) कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

(२) मा. उपाध्यक्ष यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.

(३) मा. महासंचालक यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.